## प्रकरण चौथे

# रानगंगा आणि कळवंड या कथा संग्रहाचा वाङ्मयीन विशेष

## प्रकरण चौथे

# रानगंगा आणि कळवंड या कथा संग्रहाचा वाङ्मयीन विशेष

आप्पासाहेब खोत यांचे 'कळवंड' आणि 'रानगंगा' हे दोन्ही कथासंग्रह प्रामुख्याने ग्रामीण जीवनाशीच निगडीत आहेत. 'रानगंगा' या कथासंग्रहातून लेखकाने बदलत्या सामाजिक परिस्थितीचा वेध घेण्या प्रयत्न केला आहे. तर कळवंड या कथासंग्रहातून मूक्या प्राण्यांमध्ये सुरु असणारी कळवंड त्यांच्यातील संघर्ष याच चित्रण रेखाटले आहे.

## समाज प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या कथा :-

ग्रामीण साहित्यामध्ये चौथ्या पिढीचा संवेदनाक्षम लेखक म्हणून आप्पासाहेब खोत हे नाव साहित्य क्षेत्रात स्थिर झाले आहे. सामाजिक बांधिलकी मानून समाजप्रबोधन करण्याचे उद्दीष्ट ठेवून त्यांच्या कथा आकाराला आल्या आहेत. 'रानगंगा' या कथा संग्रहातील 'मुक्ता', 'लागण' 'देविचा कोप', 'जोडणी', तर कळवंड मधील 'सबसिडी' या कथा पाहण्यासारख्या आहेत. समाज बदलतो, बदलत्या काळाबरोबरच ग्रामीण मनात नवीन वार वाहू लागते. नव्या जुन्या विचारांची सांगड घातली जाते. तेव्हा जुन फेकूनही दिल जात आणि नविन पांघरल जात. त्यावेळी नाविण्याचा बुरखा चढवलेला तरुण समाज बिघडू लागतो. रिकाम टेकड फिरणं जगणं आणि भोगणं एवढच त्याला माहित असत. शैक्षणिक सुविधा उपलब्ध असुनही वाढत्या वयाबरोबर अनेक गोष्टींच आकर्षण निर्माण होऊ लागते. या आकर्षणाच्या आहारी जावूनच तरुण मन बिघडू लागते. ती आई बापांना विसरतात. टिंगल टवाळी करण्यात जीवनाचा अनमोल वेळ वाया घालवतात. असं नव्हे तर संपूर्ण जीवनच नासवतात. याच वास्तव दर्शन खोतांच्या लागण या कथेमधून घडते. द्वारकामावशीचा बबन हा एकूलता एक मुलगा. स्वत:च्या मालकीचा जमिनीचा तुकडाही नसणारी मावशी रातध्याड राबून मुलाला शिक्षण देते. तो दहावी पास होतो. तेव्हा ती पुढील

शिक्षणासाठी त्याला शहरात कोल्हापूरला पाठवते. त्याचे सगळे लाड, हट्ट पुरवते. पण परिस्थितीची जाण नसणाऱ्या बबनला वाईट संगत लागते. तो व्यसनाधिन बनतो. त्यातच एस. वाय. बी. ए. ला नापास होतो. गावी येवून टवाळी करणाऱ्या मुलांच्यात हिंडु फिरु लागतो. मुलींची छेडछाड काढतो. दारु पिऊन आई-वडिलांना शिव्या देतो. तो सुधारावा म्हणून मावशी त्याचं लग्न लावून देते. थोड्या फार प्रमाणात तो सुधारतोही. त्याला दोन मुलेही होतात. पुढे तो असह्य आजाराने त्रस्त होतो. त्याला एड्सची लागण झालेली असते. या कथेमधून खोतांनी समाजाला ग्रासलेल्या एड्स सारख्या महाभयंकर रोगावर साहित्य क्षेत्रात प्रथमच आपल्या लेखनीने दिग्दर्शन केलेले आहे. तर 'मुक्ता' या कथेमधून स्त्री शिक्षणाचा संदेश देवून आजच्या काळात नवीन आयुष्यात पदार्पण करणाऱ्यांसाठी एड्सची चाचणी करण्याची नितांत गरज असल्याचे स्पष्ट केले आहे. समाज बदलला तसच मानवी मनही बदललं पाहिजे. प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या पांढऱ्या शुभ्र कपड्यातील पुढाऱ्यांनी प्रथमत: बदललं पाहिजे. राजकारणी प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या घराण्यातील मुक्ता ही मुलगी दहावीत केंद्रात पहिली आलेली. पण पुढील शिक्षणासाठी घरच्यांचा विरोध असतो. शिक्षण अर्ध्यातच सोडून तिला बाहुल्यावर चढवण्याचा प्रयत्न केला जातो. त्याप्रमाणे तिचा साखरपुडाही होतो. लग्नाला चारच दिवस बाकी असताना नवरदेवाला एड्सची लागण झाल्याची समजते. तेंव्हा तिचं लग्न मामाच्या मुलाशी ठरवलं जातं. नव्या विचाराची समाजाला जागृत करणारी मुक्ता तेंव्हा दोघांनीही एड्सची चाचणी करण्याचा निर्धार करते. शिवाय आपलं पुढील शिक्षण पूर्ण करण्याची अट घालते. त्याबरोबरच तुम्हा आम्हालाही झोपेतून उठवते. आजच्या बदलत्या समाजाला नवा विचार देऊन जाते. ती म्हणते, आजकाल समाजात लोक पाहुण्यांचा पदर पदराशी जुळतो का ? पत्रिका जमते का ? जातक योग्य आहे का ? खर्च भरपूर करणार आहेत का ? हे पाहण्यापेक्षा त्यांनी रक्त तपासून घ्यावं. मुलाला आणि मुलीला एड्सची लागण झाली नाही ना याची खात्री झाल्यावरच लग्न करावं. ती काळाची गरज आहे नाही तर.....[१]

विज्ञानाने प्रगती केली. खेड्यापाड्यात राजकारण शिरले. शासनाने विविध उपक्रम राबविले. सहकारी सोसायट्या आल्या. दुध डेअरी आली. खेड्याचा झपाट्याने विकास होत गेला. साखर कारखाने निघाले. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे खेड्या पाड्याच्या जवळपास शाळा, कॉलेजस् सुरु झाली. शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या. दवाखाने आले. एस. टी. बस आली. खेड्याचा कायापालट झाला. समाज बदलला पण मानवी मन बदलायला वेळच लागला. तेही थोड्याफार प्रमाणात बदलू लागले. पण संसाराच्या रेट्यात परिस्थितीच्या विळख्यात अनेक संकटांना समोरी जाताना ते समाजाला लागलेल्या अंधश्रद्धेसारख्या पिढीला बळी पडलेले दिसते. 'देवीच कोप' या कथेमधून दिसुन येते. शालन आणि बापशा नवराबायको काबाड कष्ट करुन संसार करणारी संसारात थोडे बरे दिवस येऊ लागतात. दवणीला म्हैस घेतली जाते. पण माणूस म्हटल की त्याला दुखणी खुपणी जडलेली असतातच. शिवाय जनावरालाही एकाच माणसाची सवय जडलेली असते. अशातच शालन पाय घसरुन पडते. पाय दुखावला जातो. तिच्याच हातावर असणारी दुधाची म्हैस दुध द्यायची कमी येते. याच परिस्थितीचा फायदा घेऊन जोगतीन असणारी गावातीलच आकणी जोगतीन याचा संबंध देवीच्या कोपाशी जोडून मोकळी होते. भोळ्या भाबड्या मनाची नवरा-बायको संसारात शांतता लाभावी म्हणून कर्ज काढून डोंगराच्या देवीला आणून घरात बसवतात. पण शांतता लाभण्याऐवजी संसाराला वणवाच लागला जातो. शालनचा नवरा दारुच्या आहारी जातो. अशा वेळी एक दिवस सावकार तिच्या पदराला हात घालण्याचा प्रयत्न करतो. सत्व, पावित्र्य जपणारी शालन त्याचा डाव उधळून लावते. दुसऱ्या दिवशी सर्व प्रकार ध्यानात आल्यानंतर बापशा देवीचा जगच नेऊन नदित फेकून देतो. आणि कामाला लागतो. ग्रामीण भागात बोकाळत असलेली अंधश्रद्धा यावर कांगोरे ओढण्याचा लेखकाने यशस्वी प्रयत्न केला आहे. तर देवी बसवल्याने संसारात सुखशांती लाभत नाही. तर त्यासाठी काबाड कष्ट करुन मिळवलेल्या भाजी भाकरीतही समाधान मिळते. याची सत्यता देवीचा कोप या कथेद्वारे लेखकाने पटवून दिली आहे.

समाजप्रबोधन, अंधश्रद्धानिर्मुलन, बदललेल ग्रामीण मन, बदललेला माणूस, अस्थिर झालेला समाज बिघडत असलेला तरुण समाजमन, गावात शिरलेल राजकारण याच वर्णन खोतांनी आपल्या कथेमधून केल आहे. खाण, पिण भोगणं आल. त्यातून नको ते करण आलं याचा परिणाम समाज जीवनावर झाला. सार जिणं बेगडी नकली झाल. समाजमन आंधळ बनल याचाच फायदा संधी साधू लोकांनी घेतला. हा बिघडत चाललेला समाज पाहून लेखकाच मन व्याकूळ झाल हे कुठतरी थांबायला हव म्हणून लेखकाची लेखणी तरबेज झाली यातूनच समाजप्रबोधनात्मक कथा झरझर उतरत गेल्या.

## बदलत्या संस्कृतीच दर्शन :-

गावगाड्यात होणारे बदल त्याबरोबरच बदलणारी संस्कृतीही खोतांच्या कथेमधून उमटते. समाजाचे जीवन प्रवाही राहते. चिरंतन राहते. समाज जीवंत राहतो. तो त्याच्या जवळ असणाऱ्या भौतिक सामर्थ्याने नव्हे तर त्याच्या जवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यावर आणि विचार धनावर तो जीवंत राहतो. आणि वाढतो. त्यास वाल्मीकीसारख्या महर्षीपासुन रविंद्रनाथ टागोरांसारख्या ऋषीतुल्य पुरुषांपर्यंत फार मोठी अशी आमची सांस्कृतिक परंपरा आहे.[२] हिच बदललेली सांस्कृतिक परिस्थिती खोतांनी आपल्या लेखणीने शब्दबद्ध केली आहे.

ग्रामीण साहित्य जन्मत असते ते एका विशिष्ट समाजरचनेत. लेखक वावरत असतो समाजातच म्हणूनच सामाजिक जीवनातील अनुभव तो शब्दबद्ध करत असतो. म्हणूनच आनंद यादव म्हणतात, साहित्याला कलास्वादाच्या पातळीवर एक कला वस्तू म्हणून स्थान असते. शिवाय ती एक सामाजिक वस्तू असल्याने त्या संदर्भातही साहित्याला महत्व प्राप्त होते.[३]

आज परिस्थिती बदलली, काळ बदलला तसा समाज बदलला माणूस माणसाला पारखा झाला. याच प्रत्ययकारी दर्शन खोतांच्या कथेमधून पहावयास मिळते. बदलत्या

संस्कृतीचही दर्शन खोतांची कथा घडवते. 'चिरेबंदी' मधील गौरी नवविचाराने भारावलेली विधवा स्त्री, ज्या खेड्यात विधवांचा अवमान केला जात असे. अशा खेड्यातच तिला अपमानास्पद वागणूक मिळत होती. चार चौघींसारख जेवण तिला मिळत नसे. एवढेच काय? तर विधवेच तोंड पाहिल्याने अपशकून होत असे. ही सर्व रूढी बंधने झुगारून खोट्या प्रतिष्ठेला लाथाडून प्राध्यापक असणाऱ्या काकांच्या मदतीने शिक्षणाची कास धरून विधवा पूर्नविवाह करण्यास तयार होते. शिवाय आपली प्रतिष्ठा घराण्याची अब्रू चिरेबंदी दगडी वाड्याच्या आत ठेवून नविन वाटेने जाण्याचा ध्यास घेते. त्याप्रमाणे ती खोट्या प्रतिष्ठित म्हणून मिरवणाऱ्या घरातून आपली सुटका करुन घेते. तर 'मुक्ता' मधील मुक्ता आपल्या लग्नाच्या अटी स्वत: वडिलांसमोर बोलून दाखवून शिक्षणाची आणि काळाची गरज ओळखून समाजाला नवी दिशा देते. 'रानगंगा' मधील हौसामामीचा मुलगा हौसेराव कर्तव्य विसरतो. आई वडिलांचा आदर करणारा पोटच्या मुलांवर प्रेम करणारा माणूस कर्तव्याला पारखा होतो. यातून बदलत्या संस्कृतीच दर्शन घडते. शिवाय देवीचा कोप या कथेमधून अंधश्रद्धेला बळी पडलेली नवराबायको स्वत:वर ओढवणाऱ्या प्रसंगाने स्वत:च सावरतात. देवी वगैरे काही नसून सगळीच फसवेगीरी आहे. म्हणून बापशा देवीचा जग नेऊन नदीत फेकतो. यामधून माणूस शिकला नसला तरीही अनुभवान शहाणा होतो. हा संदेश देऊन लेखकाने बदललेल्या गावगाड्याच वास्तवरुप प्रकट केले आहे. 'सबसिडी' या कथेमधून समाजात होणाऱ्या भ्रष्टाचाराच विदारक दर्शन घडविले आहे. बापूला म्हैस घेण्यासाठी करावी लागलेली धडपड शिवाय 'सबसिडी' मंजूर करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी द्यावे लागणारे पैसे यातून आजची बिघडत चाललेली समाजव्यवस्थाच प्रतिबिंबीत होते. गावगाड्यात बदल झाला. ग्रामसंस्कृती नष्ट झाली. पाटीलकी गेली, ग्रामसेवक, सरपंच आले. सरंजामशाही लोप पावली. लोकशाही आली आणि लोकशाही राज्यात स्वतंत्र देशात ग्रामीण माणूस आपल्याच माणसांच्या राज्यात स्वत:च अस्तित्व गमवून बसला. देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे उलटली तरी ग्रामीण माणूस आहे तसाच आहे. इंग्रजांच्या ऐवजी आपलेच लोक इंग्रज बनुन सत्ता प्रस्थापित करीत आहेत. समाजव्यवस्था बिघडवत

आहेत. याची वास्तवता खोतांच्या सबसिडी या कथेमधून प्रकटते. म्हणूनच ही कथा बदलत्या परिस्थितीच दर्शन घडवण्यात सार्थच आहे.

## ग्राम जीवन :-

आप्पासाहेब खोत यांच्या कथा वाचत असताना आपण ग्रामीण जीवनातच वावरत आहोत असेच जाणवते. त्यांची 'सुगरण', 'गवनेर', 'गब्रू', 'पोटावरच पोट', 'घालमेल', 'सर्जा' या कथा पाहण्यासारख्याच आहेत. 'घालमेल' मधून ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे हातात आलेल पिक पावसामुळे नाहिस होत. आणि पावसामुळे पिकाची दैना होते. तेव्हा शेतकऱ्याच्या मनाची झालेली 'घालमेल' घालमेल या कथेमधून पहावयास मिळते.

ग्रामीण व्यवस्थेचा स्वयंपूर्ण पाया हा कृषी केंद्रीत आहे. शेतकरी हा गावातील प्रमुख आणि त्याच्या भोवती आलुते बलुते अशी रचना आहे. ग्रामीण संस्कृतीही प्राचिन काळापासूनच कृषी केंद्रीत संस्कृती आहे. कृषी केंद्रीत रचना हे ग्रामसंस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच कृषी जीवन आणि शेतकरी हा ग्राम संस्कृतीचा महत्वाचा घटक पूर्वी पासुनच राहिला आहे.

त्री न. अत्रे म्हणतात, खेडे म्हटले की चटकन डोळ्यासमोर काळी आईच उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळ्या, मेंढ्या, मेंढरे, शेतकरी, गुराखी, पाट, बुडक्या विहीरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण वगैरे बळीराजाचे वैभव खेड्याचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की, खेड्यात शेती खेरीज दुसरा कोणता व्यवसाय चालत असेल, किंवा शेतकऱ्याखेरीज दुसरे कोणी राहत असेल असे एकाकी मनातही येत नाही. कुणबी पुढे झाल्याखेरीज एकही खेड्याची वसाहत झाली नाही. त्याने धान्य गोळा करुन इतरांच्या खाण्याची तरतुद केली. तेव्हा इतर जमा झाले.

शेतीला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण जीवनातील विविध घटक परस्परांना पुरक असेच आहेत. ग्रामीण साहित्यात कृषीकेंद्रीत अशी स्वतंत्र संस्कृती निर्माण होऊ शकते आणि

त्याचबरोबर कृषी जीवनाशीही निगडीत सण उत्सव साजरे केले जातात. पोळा, दसरा, अक्षयतृतीया, गुढीपाढवा हे सर्व सण उत्सव कृषी संस्कृतीशी निगडीत आहेत.[४]

आप्पासाहेब खोत यांनी आपल्या कथाविश्वातून अस्सल ग्रामीण मातीचा ओलावा टिपला. कृषीनिष्ठ माणसांच मुक्या प्राण्यांवरील प्रेम त्यांच्यावर असणारी त्यांची जीवापाड माया 'कळवंड' या कथासंग्रहातून साकारली तर संसाराला हातभार लावण्यासाठी पाळलेल्या कोंबड्यांवर ओढावणाऱ्या रोगाने ग्रामीण माणूस त्रस्त होताना दिसतो. शिवाय शेती मळ्याची राखण करणारा सर्जा. राऊंडमधील चिकण्या सारखा बळी राजाच वैभव इर्षेपोटी राऊंडला जुंपल जात. राऊंड जिंकल्यानंतर बैलांची होणारी असह्य अवस्था पाहुन इर्षेपोटी बैलाला जुंपलेल्या शिवरामचं कृषीमन जाग होत. गावगाड्यातील निसर्ग 'सुगरण' मधून प्रकटतो. तर शेतीमळ्यात धुडगुस घालणाऱ्या गवनेरच्या मृत्यूने वाचकांच मन हेलावते. बदललेल्या ग्रामीण जीवनातील स्वार्थी माणूस गावगाड्यातील वृत्ती प्रवृत्ती टिपल्यात लेखकाची लेखणी रममाण झालेली दिसते. 'डव्हाळ' मधील सासुरवाशीन रंगुचे डोहाळे पुरवताना सोना तृप्त होते. यातूनच सासुरवाशीण स्त्रीयांना होणारा त्रास, सासुकडून होणारा छळ, तिची होणारी उपासमार व्यक्त होते. तर घराघरातील जावा-जावातील साध्या कोंबडीवरून चाललेली भांडणे 'कोंबडी' या कथेमधून पहावयास मिळतात. 'थोरली आई' या कथेमधून आईचे वात्सल्य, प्रेम, माया, ममता प्रकटते. तर आ. ना. घोळ मधून ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विनोदाची गुंफण होते म्हणजे शाळा तपासणीसाठी आलेल्या साहेबांनी काही त्रुटी दाखवताच त्याची अंमलबजावणी दुसऱ्याच दिवशी वर्गात होते. ती अशी पहिलाच वर्ग वाघमारे गुरुजींचा वाघमारे गुरुजींच नाव होत. 'नामदेव हिंदूराव वाघमारे' वर्गात पळत जातात आणि पाटी वाचली तर पाटीवर ना. ही. वाघमारे.

आक्या म्हणाला 'नाही वाघमारे मग काय उंदरमारे'.

गावगाड्यात असणारा माणूस बदलला ग्रामीण भागात साऱ्या जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदान राहत होती. त्यांच्यात वैरभाव निर्माण होऊ लागला. माणूस माणसाला

पारखा झाला. राजकारणान तरुण मन नासल, भ्रष्टाचारान शासन व्यवस्था पोखरली जाऊ लागली. माया ममता पोकळ होत चालली. एकमेकांवरील विश्वास नाहिसा होत चालला. तरीही चिरमुरे गुरुजींसारख ज्ञानाची वाट दाखवणार संस्कारक्षम मन कुठेतरी जिवंत असलेल पहावयास मिळतं.

शेती निसर्ग यातून निर्माण झालेला समाजरचनेच वेगळेपण, जीवनपद्धती यातून घडत असणारे लोकमानस म्हणजेच मनोरचना आणि माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म. आजची ग्रामीण कथा ही शेतकरी कुटुंबाभोवती फिरत-फिरत समाजातील वृत्ती प्रवृत्ती न्याहाळत समाज प्रबोधन करत खोतांची कथा फुलू पाहत आहे. कुटंबाभोवती समाजात वावरत शेतकऱ्यांच्या स्त्रीच्या जीवघेण्या दु:खाला स्पर्श करत आपली वाटचाल करत आहे. यातूनच ग्रामजीवनाच दर्शन घडवू पाहत आहे.

## आशय :

आप्पासाहेब खोत यांच्या सर्वच कथा या आशयदृष्ट्या संपन्न अशाच आहेत. प्रत्येक कथा वाचत असताना ति एक वेगळाच आनंद देऊन जाते. माणसाने माणसावर तर प्रेम केलेच पाहिजे. पण मुक्या प्राण्यावरही प्रेम करण्याचा संदेश खोतांची कथा देऊन जाते. 'तानी' शेळी लेखकाची जीवाभावाची सखीच होती. ती पोट फुगुन मरते तेव्हा लेखकाच्या जिव्हरी लागते. अतिपावसामुळे रातध्याड कष्ट करुन मिळवलेला घास नाहिसा होतो. तेव्हा बापूच्या मनाची घालमेल होते. तर गव्हाला पाणी देताना टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी निसर्गातील प्रत्येक जीवाला झटाव लागत याच दर्शन 'पोटावरच पोट' या कथेमधून घडते. रुबाबदार असणारा गब्रू अस्सल नागाला सुद्धा रोखू शकणारा नागमोडी रोगाने मरू नये म्हणून विकला जातो. सुगरण चिमणी आपल सुरेख घरट फक्त तीन महिन्यासाठीच बांधताना पहावयास मिळते. तर माणसाला उभ्या आयुष्यात एकदाही घर बांधता येत नाही. याच प्रत्ययकारी दर्शन घडवते. पिसाळलेल्या सर्जाला शिवारवाल दगड

धोंड्यांनी ठेचून मारतात. अशा या इमानी सर्जाचा मृत्यू लेखकाने अत्यंत करुणामयरित्या रेखाटला आहे. 'गवनेर' वानर लेखकाचा रानामळ्यातील प्रीय मित्र होता. लेखकाला त्याच्याशिवाय आणि गवनेरला लेखकाशिवाय करमत नसे. ही कथा लेखकाच्या जीवनातील सत्य कथा आहे. 'वाटा' मधील काका बामणाचा मळा तात्या कुणालाही थांगपत्ता न लागता स्वत: विकत घेतो. तर चिरमुरे गुरुजी बाबूला शिक्षणाची नवी वाट दाखवून मळ्याचा वाटा स्वार्थी माणसांनी हिसकावून घेतला. पण ज्ञानाची दाखवलेली वाट शिक्षणाची संधी ज्ञानाचा वाटा कुणीही हिसकावून घेणार नाही. असा नविन मंत्र देऊन जातात. विठ्ठलाच्या रुपात नानाच्या घरच्या गायीच्या पोटी जन्मलेल्या चिकण्या खोंडाला राऊंडला जुंपल्यानंतर चिकण्या घायाळ होतो तेव्हा नानाचा मुलगा शिवराम याच्या मनातील बळीराजाच बैलांवरील प्रेमच जाग होत. तर 'कळवंड' मधून माणसामाणसात चालणारा सत्तासंघर्ष वानरांचा कळपाच्या राजासाठी चाललेला त्यांचा संघर्ष यातूनच मुक्या प्राण्यांमध्येही सत्ता संघर्ष आहे. याच दर्शन घडते. आ. ना. घोळ मधून मित्र प्रेम शिवाय ग्रामीण भागात असलेल्या शैक्षणिक सुविधा याच प्रतिबिंब पहावयास मिळते. 'कळवंड' या काथासंग्रहातील सर्वच कथा या आशयदृष्ट्या संपन्न अशाच आहेत. त्या मुक्या प्राण्यांवर अफाट प्रेम केल पाहिजे याचा संदेश देऊन जातात.

'रानगंगा' मधील हौसामामी कर्तव्य जपणारी तर तीचा मुलगा हौसेराव कर्तव्य झटकून मोळा झालेला. नातीच्या लग्नासाठी विकलेली गंगा म्हैस दुसऱ्या दिवशी मामीच्या दारात उधळत येऊन उभी ठाकते. अशी कथेची तिहेरी गुंफण करुन लेखकाने आपले कथाविश्व समृद्ध केले आहे. 'साळूता', 'थोरली आई', 'डव्हाळ', 'वचपा', 'कोंबडी' या कथांमधील स्त्रीया या जिव्हाळा, प्रेम, माया ममता वात्सल्य जपताना दिसतात. तरी काही स्त्रीया छोट्या-छोट्या गोष्टीसाठी सख्या जावा सख्या बहिणी एकमेकांबरोबर भांडताना पहावयास मिळतात. 'मुक्ता' मधील मुकता आणि 'चिरेबंदी' मधील गौरी या स्त्री व्यक्तीरेखा नवविचाराने भारावलेल्या समाजव्यस्थेवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. 'देवीचा कोप' ही कथा अंधश्रद्धेवर प्रकाश टाकणारी कथा आहे. ति प्रबोधनात्मक कथाही

आहे. 'फेसाटी आणि गारवा' या वेगळ्या पार्श्वभूमीच्या वेगळ्याच ताकदीच्या कथा आहेत. तर 'जोडणी' या कथेमधून गोर-गरीब जनतेची स्वार्थी सत्ताधिकाऱ्यांकडून पिळवणूक होताना दिसते. काडतूस आण्णा ही एक स्वातंत्र्य सैनिकाच्या सन्माची कहाणी आकारली आहे. तर 'लागण' या कथेमधून द्वारकामावशीची वात्सल्यरुपीमूर्ती रेखाटत एडस् सारख्या महाभयंकर रोगावर प्रबोधन केले आहे.

आप्पासाहेब खोत यांच्या रानगंगा आणि कळवंड या दोन्हीही कथा संग्रहातील कथा या ग्रामजीवनाशी संबंधित असून खेड्यातील आजुबाजुच्या परिसराचे वर्णन करुन समाजातील वृत्ती प्रवृत्तीवर कांगोरे ओढण्यात लेखकाची लेखणी यशस्वी झाली आहे. लेखकाला जीवनात जे जे अनुभव आले ते ते लेखकाने आपल्या कथेत आशयरुपाने व्यक्त केले आहेत. कथेतील जाणिवपूर्वक केलेली पात्रांची रचना आणि सहजसंवाद यामुळे कथा आशय दृष्ट्या संपन्न बनल्या आहेत. शिवाय कथेतील पात्रांची नावे मिळती जुळती असल्याने त्या वाचकांच्या हृदयाला जावून भिडतात.

## विषय :-

विषयाची विविधता हाताळूनच खोतांची कथा आकाराला आली आहे. विषयाचे वैविध्य हा खोत यांच्या लेखणीचा वेगळाच पिंड आहे. तो आजुबाजुच्या परिसरात घडणाऱ्या घटनांवर पोसला आहे. त्यामुळेच खोतांच्या कथाविश्वात विषयाची विविधता आढळते. बदलत्या ग्रामीण व्यवस्थेत बदलत वार येत. त्याचबरोबर समाजातील वृत्ती प्रवृत्तीही स्पष्ट होत जातात. अतिपावसामुळ होणारी शेकऱ्याची घालमेल ही पहावयास मिळते. त्याचबरोबर दुष्काळासारख्या परिस्थितीत माणूस स्वत:च भान हरपून नाचू लागतो. याच दर्शन 'वाळवण' या कथेमधून घडते. तर गावगाड्यातील स्त्रीयांच्या वृत्तीप्रवृत्ती तिथले वातावरण, समाजात होणारे स्त्रीयांच हाल अपेष्टा या सारखे विषयही त्यांच्या कथेत डोकावतात. तर आजच्या बदलत्या युगात शिक्षणाची नितांत गरज आहे हे 'मुक्ता' ही

कथा सांगून जाते. तर विधवा पूर्नविवाहाचा नवा विचार घेऊन चिरेबंद मधील गौरी येते. एड्स सारख्या रोगाने ग्रामीण भागात प्रवेश केल्याचे 'लागण' या कथेमधील बिघडलेला तरुण. वाममार्गाला लागलेला बबन या व्यक्तीपात्रातून दृष्टीस येते. यासारख्या कथांमधून समाजप्रबोधनाच उद्दिष्ट ठेवून त्यांच्या समाजप्रबोधनात्मक कथा साकारल्या. बदलत्या समाजात वावरणाऱ्या लोकांच्या जीवनाचे अनेक पैलू खोतांच्या कथेमधून पहावयास मिळतात. श्रद्धा अंधश्रद्धा स्त्रीयांच दु:ख, वेदना, दारिद्रय समाजप्रबोधन बिघडत चाललेली शासन व्यवस्था यासारख्या अनेक विषयाच सूक्ष्म निरिक्षण करुन त्यांनी आपल्या कथाविश्वाच विषय बनविले आहेत. म्हणूनच त्यांच्या कथांमधून विषयाच वैविध्य जाणवते.

**भाषा :–**

सहज–सरळ भाषेने खोतांची कथा परिणामकारक बनते. खोतांच्या कथा वाचताना अभिव्यक्तीच्या अंगाने चटकन जाणवतो. तो म्हणजे भाषिक अविष्कार साधी सरळ पण अंत:करणाला जाऊन भिडणारी भाषाशैली कथा प्रभावी आणि अधिक परिणामकारक बनवते. याची जाणिव खोतांना आहे. म्हणून त्यांच्या कथेतील भाषाही कथेच्या पात्रातील व्यक्तीमत्वाला मिळती–जुळती असुन वेगवेगळ्या ठिकाणी त्या–त्या पात्रानुसार बदलत जाते. काही ठिकाणी प्रतिमांचा प्रतिकांचा वापर करताना अढळते. ग्राम जीवनात आढळणाऱ्या नागर आणि ग्राम भाषेची सरमिसळ खोतांच्या कथेमधून जाणवते. शब्दप्रयोग, वाक्यरचना पात्रांची नावेही ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेली पहावयास मिळतात. आलंकारीक ओढून तोडून भाषा न वापरता सहज साध्या सरळ भाषेमुळे खोतांच्या कथा या सर्वसामान्यांना मनापासून आवडतात. त्या वाचतांना त्यांच्या कथा या वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडतात.

## संस्कृतीशी समाजाशी असणारे नातेसंबंध :-

माणूस जन्माला येतो तेव्हापासुन त्याची नाळ समाजाशी जोडली जाते. तो ज्या समाजात जन्मातो त्या समाजातील संस्कृतीशी त्याच जन्माच नात असत. लहानपणापासूनच समाजात वावरत असताना जे-जे अनुभव येतात. त्याच डोळसपणे निरिक्षण करुन आपल्या भावना लेखणीद्वारे उतरतात तोच खरा जातिवंत साहित्यिक असतो. साहित्याची कमळेही समाजाच्या तलावातच उमलत असतात. म्हणूनच समाजात घडणाऱ्या घटना बदलणारी समाज व्यवस्था याच प्रतिबिंब साहित्यात उमटत असत. खोतांच्या कथा या समाजातच आकाराला आल्या. रानामळ्यात बालपण गेल्यामुळे मातीचा गंध त्यांच्या साहित्यात दरवळतो शिवाय वात्सल्यरुपी आईचे संस्कार यातूनच आप्पासाहेब खोत हे घडत गेले. लेखकाने अनुभवलेले जगलेले असते. तेच त्यांच्या कथांचा विषय बनते. समाजाच ऋण मानुन आपण आपल्या संस्कृतीचे समाजाशी असणारे नाते संबंध उलगडण्यातच लेखकाची लेखणी रमूण जाते. समाजाच ऋण आपल्या अंगावर आहे. ते फेडण्यासाठी लेखक आपल साहित्य आकाराला आणतो. यातूनच समाजात चालणारे हेवेदावे, वृत्तीप्रवृत्ती गावगाड्यात निर्माण झालेली अस्थिरता याच चित्रण खोतांची कथा करते.

जखले सारख्या छोट्याशा खेडेगावात जन्मलेल्या आपल्या लेखनीने सामाजिक नाते संबंध जपण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबरोबरच गावगाड्यात बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर कोरडे ओढले आहेत. खोतांच्या कथा वाचत असताना एकदा का कथेतील आशयाने वाचकांच्या मनाची पकड घेतली की ती सहजच वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडते. वाचकाला अंतर्मूख बनवते. हाच खोतांच्या कथेचा खरा पिंड आहे. ज्या खेड्यात आर्धी चतकोर वाटून खाल्ली जात होती. त्याच खेड्यात भाकरी हिसकावून घेतली जात आहे. माणूस स्वार्थी बनत चालला आहे. स्वार्थाने भ्रष्टाचाराने गावगाड्यात कल्लोळ माजवला आहे. पाटीलकी जाऊन लोकशाही आली आहे. त्यातून राजकारण फोफावत

आहे. याचाच संधीसाधू फायदा घेत आहेत. म्हणूनच समाजाला लोकशाहीच शिक्षण दिल पाहिजे. सत्प्रवृत्ती संस्कार दिले पाहिजेत. अनेक ठिकाणी प्रबोधनात्मक व्याख्यान माला होतात. आणि तरिही समाजात भ्रष्टाचार हा होतच राहतो. अंधश्रद्धेवर अनेक कार्यक्रम होतात. माणसं ते बघतात आणि उघड्या डोळ्यांनी स्वतःच अंधश्रद्धेला बळी पडलेली पहावयास मिळतात. माणसाच्या मनाचाही माणसाला धाक असला पाहिजे. याच सूक्ष्म चित्रण साहित्यातून साकारते. म्हणूनच वाचनाने मानवी समाज घडत जातो. अस आपण म्हणत असतो ते खरच आहे.

इतर कलांचा परिणाम माणसांच्या मनावर होतो. तसेच एकच ग्रंथ लोक पुन्हा पुन्हा वाचत असतात. बोलत असतात. त्यावर चर्चा करत असतात. म्हणूनच लेखक श्रेष्ठ ठरतो. मानवी व्यवहाराची चिकित्सा होऊ लागली. या चिकित्सेमुळे विवेक निष्ठा वाढीला लागली म्हणूनच ग्रामीण साहित्यातील आप्पासाहेब खोत यांच्या कथा ग्रामीण साहित्यातील मानवी मनाची चिकित्सा करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या आहेत. आप्पासाहेब खोत हे आजच्या ग्रामीण साहित्यात आपल्या लेखणीने उज्ज्वल कामगिरी करीत आहेत. इथुनपुढच्या त्यांच्या साहित्यिक वाटचाल यशस्वीरित्या पूर्ण होईल यात शंकाच नाही.

**संदर्भ टीपा :-**


१) रानगंगा :- प्रा. आप्पासाहेब खोत,

मॅजिक प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. २२

२) सह्याद्रीचे वारे :-यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक भाषणांचा संग्रह.

प्रथमावृत्ती १९६२

३) ग्रामीण साहित्य स्वरुप आणि बोध :- नागनाथ कोत्तावळे

मेहता पब्लीशिंग हाऊस, प्रथमावृत्ती १९८५, पृष्ठ क्र. ५

४) ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध :- नागनाथ कोत्तावळे

मेहता पब्लीशिंग हाऊस, प्रथमावृत्ती १९८५

५) गावगाडा :- त्रिंबक नारायण अत्रे

प्रथमावृत्ती १९१५.

६) कळवंड :- प्रा. आप्पासाहेब खोत

प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. पृष्ठ क्र. ११९